तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी जे जातीचे दाखले दिलेले आहेत ते ग्राह्य धरण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक : सीबीसी १०९६ / प्र. क्र. ४८ / मावक - ५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १३ सप्टेंबर १९९६

**वाचा :** शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक : सीबीसी - १०९६ / प्र. क्र. ४८ / मावक - ५, दिनांक ३/६/१९९६

## परिपत्रक

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक : सीबीसी - १०९६ / प्र. क. ४८ / मावक - ५, दिनांक ३ / ६ / १९९६ अन्वये उपविभागीय अधिकारी (महसूल) उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांना अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी प्रशासकीय दृष्ट्या जातींच्या प्रमाणपत्राच्या कामाची वाटणी उपजिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्यामध्ये करावी अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या होत्या. त्यामुळे त्यांनी ज्या दिनांकापासून उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी यांचेमार्फत जातीचे दाखले देण्याचे काम सुरु केले असेल **यापूर्वी जातीचे दाखले देण्याचे अधिकार तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडे होते त्यामुळे यापूर्वी तालुका कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी जे जातीचे दाखले संबंधित व्यक्तींना दिलेले असतील ते नियुक्ती प्राधिकारी व सर्व संबंधितांनी ग्राह्य धरावेत.**

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**(स. नु. गावीत)**
**शासनाचे अवर सचिव**